महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/मूळकागदपत्रे/तक्रारी/२०२१/ 2094 दिनांक : 05 MAY 2021

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व
शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालये,

विषय : विद्यार्थ्यांना मूळ शैक्षणिक कागदपत्रे परत करण्याबाबत..

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/शास्ती/२०२१/१४७ दिनांक १८/०३/२०२१.
२. संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१९/७७८ दिनांक ०५/१०/२०१९.
३. शासन पत्र क्र.बैठक-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४ दिनांक ०८/०२/२०२१.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यांत येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४ दिनांक ०३/०१/२०१९ अन्वये विद्यार्थ्याने कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यासाठी जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका / पदवी व इतर कागदपत्रे त्याने परत मागणी केल्यास ती ३ दिवसांच्या आत परत करण्याची कालमर्यादा निहीत करण्यात आलेली आहे. या संदर्भात संचालनालयाच्या संदर्भ क्र.१ वर नमूद केलेल्या पत्रामध्ये कलम २३ द्वारे प्रसिध्द केलेल्या सूचनांचे अनुषंगाने कार्यवाही करावी.

१. शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४ दिनांक ०३.०१.२०१९ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

२. शासन परिपत्रकाचे उल्लंघन करुन विद्यार्थ्यांना त्यांची कागदपत्रे परत करण्यास दिरंगाई केल्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबतदार राहतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सोबत संदर्भिय पत्रे जोडण्यांत आलेली आहेत.

**(डॉ. दत्तात्रय जाधव)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail : desk4a@ dtemaharashtra.gov.in Internet:http/www.dtemaharashtra.gov.in

क्र.२अ/एडीएम/शास्ती/२०२१/५४८ दि. 18 MAR 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

**विषय : विद्यार्थ्यांना मुळ शैक्षणिक कागदपत्रे परत करण्याबाबत.**

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१९/१११८, दि ५ ऑक्टोबर २०१९
२. शासन पत्र क्र बैठक-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि ४ दि.०८/०३/२०२१

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र संकिर्ण २०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४, दि.०३.०१.२०१९ अन्वये कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यासाठी जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/ पदवी व इतर कागदपत्रे त्यांने परत मागणी केल्यास ती ३ दिवसाच्या आत परत करण्याची कालमर्यादा विहीत करण्यात आलेली आहे. या संदर्भात संचालनालयाच्या संदर्भ क्र.१ वर नमूद केलेल्या पत्रामध्ये नमूद केलेल्या सूचना आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना देण्याबाबत आपणांस कळविण्यात आलेले आहे.

तथापि व्यावसायिक अभ्यासक्रमास शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांने मध्येच शिक्षण सोडल्यास त्यास शैक्षणिक वर्षाचे पूर्ण शूल्क भरण्याची सक्ती करण्यात येते व त्याखेरीज त्याची मूळ कागदपत्रे त्याला परत करण्यात येत नाहीत अशा स्वरुपाच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, त्यामुळे आपल्या अधिनस्त संस्थांना दि.०३.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या पुन्हा सूचना देण्यात याव्यात तसेच <u>दि.०३.०१.२०१९ नंतर प्रवेश नियमातील तरतूदींचा भंग झाल्यामुळे २०१५ च्या अधिनियमातील तरतूदीनुसार किती संस्थांना शास्ती लावण्याचा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करण्यासाठी आपल्या विभागाने पाठविला आहे याची माहिती सादर करावी.</u>

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 19 MAR 2021 आवक क्र. २६८०

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत : मा.अवर सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०००३२ यांना त्यांच्या संदर्भ क्र.२ च्या पत्राच्या अनुषंगाने माहितीकरीता सादर (लक्षवेध : श्री.संजय औ.धारुरकर, अवर सचिव)

शिवि-५ 19/03/2021

\\192.168.1.9\Desk2a\Desk 2a- 3 (khanolkar)\Letter to R.O.20.doc

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

दूरध्वनी क्र ०२२-२२०४०९३५.
Email ID : sanjay.dharurkar@nic.in

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

क्रमांक : बैठक-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४

दिनांक : ८ फेब्रुवारी,२०२१

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

पत्र प्राप्त झाले
9 FEB 2021
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

विषय : विद्यार्थ्यांना मूळ शैक्षणिक कागदपत्रे परत करणेबाबत.
संदर्भ : शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/ तांशि-४, दिनांक ३ जानेवारी,२०१९

शासन परिपत्रक दिनांक ३/१/२०१९ अन्वये, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन ), अधिनियम, २०१५ मधील कलम २०(१) मधील तरतूदी विचारात घेऊन या अधिनियमाच्या कलम २३ व्दारे प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक २४/४/२०१७ व दिनांक ५/६/२०१८ च्या अधिसूचनेतील प्रवेश नियमाच्या नियम १५ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना देण्यात आल्या आहेत. संस्था या प्रवेश नियमातील तरतूदीचे पालन करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांविरुध्द अधिनियमाच्या कलम २० नुसार शास्ती करण्याचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा, असेही परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात आले आहे.

२. परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना स्वयंस्पष्ट आहेत . तथापि, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने मध्येच शिक्षण सोडल्यास त्यास शैक्षणिक वर्षाचे पूर्ण शिक्षण शुल्क भरण्याची सक्ती करण्यात येते व त्याची मूळ कागदपत्रे त्याखेरीज परत करण्यात येत नाहीत, अशा स्वरुपाच्या

काही तक्रारी ई-मेल व्दारे शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे दिनांक ३/१/२०१९ च्या परिपत्रकातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांना पुन्हा देण्यात याव्यात. तसेच दिनांक ३/१/२०१९ नंतर प्रवेश नियमातील तरतूदींचा भंग झाल्यामुळे २०१५ च्या अधिनियमातील तरतूदीनुसार किती संस्थांना शास्ती लावण्याचा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला आहे याची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. सोबत श्रीमती सुनिता दिनकर साळुंखे यांचा दिनांक २२/१२/२०२० चा तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी जोडला आहे.

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

E:\२५.०७.२०२० data bakcup\NCK\सन २०१८\नोट व पत्रे\प्र.क्र.४२७-१८ कु.मानस रोहिदास मांडे.हया विद्यार्थिनीची तक्रार.docx

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail : desk4a@ dtemaharashtra.gov.in Internet:http/www.dtemaharashtra.gov.in

क्र.२अ/एडीएम/शास्ती/२०२१/७७८ दि. 18 MAR 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

**विषय : विद्यार्थ्यांना मुळ शैक्षणिक कागदपत्रे परत करण्याबाबत.**

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१९/७७८, दि.५ ऑक्टोबर २०१९
२. शासन पत्र क्र.बैठक-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४ दि.०८/०२/२०२१

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकिर्ण २०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४. दि.०३.०१.२०१९ अन्वये कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यासाठी जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/ पदवी व इतर कागदपत्रे त्यांने परत मागणी केल्यास ती ३ दिवसाच्या आत परत करण्याची कालमर्यादा विहीत करण्यात आलेली आहे. या संदर्भात संचालनालयाच्या संदर्भ क्र.१ वर नमूद केलेल्या पत्रामध्ये नमूद केलेल्या सूचना आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना देण्याबाबत आपणांस कळविण्यात आलेले आहे.

तथापि व्यावसायिक अभ्यासक्रमास शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांने मध्येच शिक्षण सोडल्यास त्यास शैक्षणिक वर्षाचे पूर्ण शुल्क भरण्याची सक्ती करण्यात येते व त्याखेरीज त्याची मूळ कागदपत्रे त्याला परत करण्यात येत नाहीत अशा स्वरुपाच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, त्यामुळे आपल्या अधिनस्त संस्थांना दि.०३.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकातील तरतूदीचे काटेकोरपणे पालन करण्याच्या पुन्हा सूचना देण्यात याव्यात तसेच दि.०३.०१.२०१९ नंतर प्रवेश नियमातील तरतूदींचा भंग झाल्यामुळे २०१५ च्या अधिनियमातील तरतूदीनुसार किती संस्थांना शास्ती लावण्याचा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणांकडे सादर करण्यासाठी आपल्या विभागाने पाठविला आहे याची माहिती सादर करावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत : मा.अवर सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०००३२ यांना त्यांच्या संदर्भ क्र.२ च्या पत्राच्या अनुषंगाने माहितीकरीता सादर (लक्षवेध : श्री.संजय औ.धारुरकर, अवर सचिव)

\\192.168.1.9\Desk2a\Desk 2a- 3 (khanolkar)\Letter to R.O.20.doc

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

दूरध्वनी क्र ०२२-२२०४०९३५.
Email ID : sanjay.dharurkar@nic.in

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

क्रमांक : बैठक-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४

दिनांक : ८ फेब्रुवारी,२०२१

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

पत्र प्राप्त झाले
9 FEB 2021
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

विषय : विद्यार्थ्यांना मूळ शैक्षणिक कागदपत्रे परत करणेबाबत.
संदर्भ : शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, प्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/ तांशि-४, दिनांक ३ जानेवारी,२०१९

शासन परिपत्रक दिनांक ३/१/२०१९ अन्वये, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन ), अधिनियम, २०१५ मधील कलम २०(१) मधील तरतूदी विचारात घेऊन या अधिनियमाच्या कलम २३ व्दारे प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक २४/४/२०१७ व दिनांक ५/६/२०१८ च्या अधिसूचनेतील प्रवेश नियमाच्या नियम १५ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना देण्यात आल्या आहेत. संस्था या प्रवेश नियमातील तरतूदीचे पालन करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांविरुध्द अधिनियमाच्या कलम २० नुसार शास्ती करण्याचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा, असेही परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात आले आहे.

२. परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना स्वयंस्पष्ट आहेत . तथापि, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने मध्येच शिक्षण सोडल्यास त्यास शैक्षणिक वर्षाचे पूर्ण शिक्षण शुल्क भरण्याची सक्ती करण्यात येते व त्याची मूळ कागदपत्रे त्याखेरीज परत करण्यात येत नाहीत, अशा स्वरुपाच्या

काही तक्रारी ई-मेल व्दारे शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे दिनांक ३/१/२०१९ च्या परिपत्रकातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांना पुन्हा देण्यात याव्यात. तसेच दिनांक ३/१/२०१९ नंतर प्रवेश नियमातील तरतूदींचा भंग झाल्यामुळे २०१५ च्या अधिनियमातील तरतूदीनुसार किती संस्थांना शास्ती लावण्याचा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला आहे याची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. सोबत श्रीमती सुनिता दिनकर साळुंखे यांचा दिनांक २२/१२/२०२० चा तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी जोडला आहे.

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

E:\२५.०७.२०२० data bakcup\NBK\सन २०१८\नोट व पत्रे\प्र.क्र.४२७-१८ पु.भाजप सोहिदासे यांचे च्या विद्यार्थिनीचे संचार.docx

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक : ०३ जानेवारी, २०१९

वाचा :- १) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१६/ सीआर.४७३/(भाग-३)/टीई-४, दिनांक २४ एप्रिल,२०१७

२) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१६/ प्र.क्र.४७३/१६(भाग-४)/तांशि-४, दिनांक २४ एप्रिल,२०१७

३) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१८/ सी.आर.२८/टीई-४, दिनांक ५ जून,२०१८

४) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१८/ सी.आर.२६/टीई-४, दिनांक ५ जून,२०१८

परिपत्रक :

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २०(१) मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे :-

(१) कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले आहे असे, जर नियामक प्राधिकरणाचे मत झाले असेल तर त्यास, अशा व्यक्तीला,--

(क) पहिल्या वेळेच्या उल्लंघनाबद्दल, एक लाख रुपयांहून कमी नसेल परंतु, पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढी किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेएवढी, यापैकी जी अधिक असेल, एवढी शास्ती भरण्याचे;

(ख) दुसऱ्या किंवा नतंरच्या उल्लंघनाबद्दल, दोन लाख रुपयांहून कमी नसेल परंतु, दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढी किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेएवढी, यापैकी जी अधिक असेल, एवढी शास्ती भरण्याचे; निदेश देता येतील.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २३ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन पूर्ण वेळ व्यावसायिक पदव्युत्तर पदवी तांत्रिक पाठ्यक्रम अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, व्यवस्थापनशास्त्र, संगणक उपयोजन (Computer Application) तसेच पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांचे प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान या अभ्यासक्रमामध्ये द्यावयाचे प्रवेश विनियमित करण्यासाठी दिनांक २४ एप्रिल,२०१७ रोजी दोन स्वतंत्र नियम अधिसूचित करण्यात आले आहेत. या दोन्ही नियमांना दिनांक ५ जून,२०१८ च्या दोन स्वतंत्र अधिसूचनेव्दारे सुधारणा करण्यात आलेली आहे. या दोन्ही नियमांच्या मुख्य नियमांमध्ये नियम १५ समाविष्ट करण्यात आलेला आहे. पदव्युत्तर पदवी व पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या या दोन्ही सुधारणा नियमातील नियम क्रमांक १५(ग) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे :-

१५. प्रवेश रद्द करणे व शुल्काचा परतावा, संस्थेव्दारे कागदपत्र परत देणे,

(ग) "कोणतीही संस्था, ज्यांच्याकडे उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे, पदविका/ पदवी, व इतर कागदपत्रे त्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी जमा केलेली असतील, व जर उमेदवार अशा संस्थेमध्ये अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतील अशा प्रसंगी जमा करण्यात आलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी, व इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाहीत किंवा त्यासाठी अशा अभ्यासक्रमाचे किंवा इतर कोणतेही शुल्क अदा करण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकणार नाहीत."

३. वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतूदी व त्या खाली तयार केलेल्या नियमातील तरतूदी पाहता कोणत्याही संस्थेस विद्यार्थ्याने त्यांच्याकडे जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी व इतर कागदपत्रे कोणत्याही कारणास्तव स्वत:कडे ठेऊन घेता येणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत कागदपत्राची विद्यार्थ्याने मागणी केल्यास संस्थेला ती विद्यार्थ्याला परत करावीच लागतील. नियमातील या तरतूदीचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालक यांनी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना द्याव्यात. त्याचप्रमाणे, विद्यार्थ्याची मूळ कागदपत्रे संस्था परत करीत नसल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्या विद्यार्थ्यास सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडे तक्रार दाखल करण्याचा सल्ला द्यावा. तसेच विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांनी वर नमूद अधिनियमातील व त्याखालील नियमातील तरतूदी संस्थेच्या

निदर्शनास आणून विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्रे ३ दिवसाच्या आत त्यास परत करण्याचे संस्थेस सूचित करावे. याउपरही, संस्थेने नियमातील तरतूदीचे पालन करीत नसल्याचे विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांच्या निदर्शनास आल्यास त्यांनी अशा संस्थांविरुध्द महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन ), अधिनियम, २०१५ मधील कलम २० नुसार शास्ती करण्याचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालकांकडे पाठवावा. तंत्र शिक्षण संचालकांनी हा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणासमोर उचित अभिप्रायासह ठेवावा व तसे विद्यार्थ्यास सूचित करावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०१०३१२०१०५८००८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2019.01.03 15:03:04 +05'30'

( संजय औ. धारुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये

**प्रत :**

१) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी,
६) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
७) निवड नस्ती (तांशि-४)

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१९/७७७८
दिनांक : 5 OCT 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन),अधिनियम २०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याबाबत....

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.४२७/ तांशि-४.दिनांक १६.९.२०१९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.४२७/ तांशि-४,दिनांक ३.१.२०१९ अन्वये कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यासाठी जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/ पदवी व इतर कागदपत्रे त्याने परत मागणी केल्यास ती ३ दिवसाच्या आत परत करण्याची कालमर्यादा विहीत करण्यात आलेली आहे. तथापि सदर शासन परिपत्रकाचे पालन होत नसल्यामुळे न्यायालयीन प्रकरणे उद्भवत असून विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी होत असल्याचे निदर्शनास येत आहे. मा.उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ८१०९/२०१९ च्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्या विद्यार्थ्यांची संस्थेत प्रवेश घेण्यासाठी जमा केलेली प्रमाणपत्रे ७ दिवसांच्या आता परत करण्याचे आदेश दिलेले आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता कळविण्यात येते की, खालील सूचना आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना देण्यात याव्यात.

१. शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.४२७/ तांशि-४,दिनांक ३.१.२०१९ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.
२. शासन परिपत्रकाचे उल्लंघन करुन विद्यार्थ्यांना त्यांची कागदपत्रे परत करण्यास दिरंगाई केल्यास संबंधित शैक्षणिक संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

वरील प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास त्वरीत सादर करावा.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांना संदर्भाधीन पत्रासंदर्भाने माहितीस्तव सादर

E:\Budage\2019-20\General Correspondence\Circular for return documents to students immidiately.docx

१

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, खोली क्र४४१
चौथा मजला ,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४०९३५
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१९

प्रति.
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पत्र प्राप्त झाले
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

विषय : रीट याचिका क्र. ८१०९/२०१९
आकाश मुंजाजी कंधारे
विरुध्द
महराष्ट्र शासन व इतर

उपरोक्त विषयाबाबतचे सहायक निबंधक, मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, यांचे दि. २६/०७/२०१९ चे पत्र व सहपत्रे सोबत जोडली आहेत.

२. या विषयाच्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४, दि.०३/०१/२०१९ अन्वये विद्यार्थ्यांने कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यासाठी जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी व इतर कागदपत्रे त्याने परत मागणी केल्यास ती ३ दिवसाच्या आत परत करण्याची कालमर्यादा विहीत करण्यात आली आहे. त्याप्रमाणे, विभागीय तंत्र शिक्षण संचालनालय कार्यालयाकडून कार्यवाही तातडीने होणे आवश्यक आहे. तथापि ती होत नसल्यामुळे न्यायालयीन प्रकरण उद्भवत असल्याचे अथवा विद्यार्थी याबाबत शासनाकडे तक्रार करित असल्याचे सातत्याने निदर्शनास येत आहे.

३. रीट याचिका क्र. ८१०९/२०१९ च्या संदर्भामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिकाकर्त्या विद्यार्थ्यांची संस्थेत प्रवेश घेण्यासाठी जमा केलेली प्रमाणपत्रे ७ दिवसाच्या आत परत करण्याचे आदेश दिले आहेत.

४. तरी दि. ०३/०१/२०१९ च्या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्याच्या योग्य त्या सूचना सर्व विभागीय तंत्र शिक्षण संचालनालय तसेच संस्थांना कृपया त्वरित द्याव्यात. विद्यार्थ्यांना त्यांची कागदपत्रे परत करण्यास दिरंगाई करणाऱ्या शैक्षणिक संस्थांचे संबंधित प्राचार्य या प्रकरणी जबाबदार ठरविण्यात येतील, अशा सूचना सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरून द्याव्या. तसेच उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास कृपया तात्काळ सादर करावा

(संजय धारुरकर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

(2082)

का. २३/९०

Urgent

१७/९

C:\Users\Sanjay Dharurkar\Desktop\chaitanya

शा. २४६४
दिनांक .१७/९/१९

826
22/08

1651
22/08/19

TIME LIMIT : WITHIN 7 DAYS
CIVIL / D.D / NO 90791 / 2019
DATED 26/7/2019

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
## BENCH AT AURANGABAD

## WRIT PETITION NO. 8109 OF 2019

14, 21, 41
(UNDER ARTICLE/S 226 AND ~~227~~ OF THE CONSTITUTION OF INDIA)

AKASH MUNJAJI KANDHARE — PETITIONER/S
Versus
THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS — RESPONDENT/S

TO,

1. The State of Maharashtra through its Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai-400 032.

2. The Maharashtra State CET Test Cell, through its Commissioner. Head Office 8th floor, New Excelsior Building, A.K. Nayak Marg, Fort Mumbai-400 001

3. The Joint Director, Technical Education Regional Office, Station Road Osmanpura, Near Govt. Polytechnic Campus, Aurangabad 431005

4. The Peoples Education Society's College of Engineering, Aurangabad through its Principal Nagsenvan Near Panchakki. Aurangabad-431002

5. The State of Maharashtra through its Government Pleader Bombay High Court Bench at Aurangabad.

14, 21, 41

WHEREAS the petitioner had filed the above petition under Articles 226 and ~~227~~ of the Constitution of India, praying vide prayer clause (B) By issuing writ of mandamus or any other writ of like nature the respondent no. 4 may kindly be directed to return the original documents submitted by the petitioner at the time of taking admission with the respondent no.4. (C) The By issuing writ of mandamus or any other or any other writ of like nature the respondent no. 1 to 3 may kindly be directed take action against the respondent no.4 and to ensure that the original documents of the petitioner are returned back by the respondent no 4.

AND WHEREAS Rule and interim stay/injunction was granted by this Court

AND WHEREAS the said Petition came up for final hearing before this Court

(CORAM : S V GANGAPURWALA AND MANGESH S. PATIL, JJ. ) ON 15/07/2019

AND UPON hearing Mr. Wani h/f. Bajaj Anil S Advocate for the Petitioners
Mr. P.K. Lakhotiya, AGP for respondents/state
Mr. S.G. Karlekar , Advocate for respondent no.2.
Mr. Nagargoje Ankush N. Advocate for respondent no 4.

This Court has Passed the following order

(Copy of Order dtd. 15/07/2019 enclosed herewith)

It is accordingly ordered that this order be punctually observed and carried into execution by all concerned.

WITNESS HON'BLE SHRI PRADEEP NANDRAJOG, Esquire, Chief Justice, at Bombay aforesaid this 15th day of July , two thousand and nineteen

By the Court,

Assistant Registrar

Dated this 25th day of July, 2019

NOTE : This writ should be returned to this office after taking necessary note in your office register and after making an endorsement on the writ to that effect.

13465/19
09/08/19

The record and proceedings in the matter are returned herewith. The accompanying receipt for the same may please be returned to this office duly signed

No. D.D of 2019

Copy forwarded with compliments for information to the in continuation of High Court Stay Writ No. , dated

High Court, Appellate Side,
Bombay, dated 2019

for Additional Registrar

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
BENCH AT AURANGABAD

103 WRIT PETITION NO.8109 OF 2019

AKASH MUNJAJI KANDHARE
VERSUS
THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS
...
Advocate for Petitioners : Mr. Wani h/f. Bajaj Anil S.
AGP for Respondents/State : Mr. P.K. Lakhotiya
Advocate for Respondents : Mr. S.G. Karlekar for R/2.
Advocate for Respondents : Mr. Nagargoje Ankush N. for R/4
...

CORAM : S.V. GANGAPURWALA &
MANGESH S. PATIL, JJ.
DATE : 15.07.2019

P.C. :-

The learned counsel submits that the respondent no.4 is not returning the original documents submitted by the petitioner at the time of taking admission with respondent no.4-college on the ground that the petitioner is required to pay fees.

2. Mr. Nagargoje the learned counsel submits that the petitioner had taken admission with respondent no.4-college B.E. (Computer Science Course) and the last cut-off date for cancellation of admission was 31.08.2018. The petitioner cancelled his admission on 30.09.2018. According to the learned counsel, the petitioner thereafter did not attend the college. Because of the cancellation of admission after the last cut-off date the seat offered to the petitioner fell vacant. The petitioner has not paid the fees to

the respondent-college for the academic year 2018-2019 and for the course to which the petitioner was admitted. The petitioner be directed to pay the fees then only the respondent no.4-college would return the documents.

3. Recovery of fees and or any other dues is a different matter altogether. The respondent no.4-college cannot retain the documents presented by the petitioner on the ground that fees is not paid. The respondent no.4 does not have the right of lien over the documents submitted by the petitioner. The respondent no.4 if is of the view that the petitioner is liable to pay the fees then the respondent no.4 may take appropriate steps for recovery of fees from the petitioner, however on the ground that some fees is recoverable from the petitioner cannot retain/detain the documents submitted by the petitioner.

4. In light of the above, we direct the respondent no.4 to return all the original documents submitted by the petitioner at the time of seeking admission with the respondent no.4-college for the B.E. (Computer Science Course) for the academic year 2018-2019. It may put an endorsement on the said documents about the petitioner having taken admission in his college. The documents shall be returned within a period of seven days. Writ petition is disposed of. No costs.

Sd/-

For Deputy Registrar